## प्रेस नोट

### कासव तस्करी करणारे स्थानीक गुन्हे शाखा बुलडाणा चे जाळयात

श्री. डॉ. दिलीप पाटील भुजबळ, पोलीस अधीक्षक, बुलडाणा व श्री.डॉ संदिप पखाले, अपर पोलीस अधीक्षक, बुलडाणा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. महेंद्र देशमुख यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे स पो नि विजय मोरे ,पो हे कॉ सुधाकर काळे, नापोकॉ दिपक पवार, संजय नागवे, पोकॉ विजय सोनोने यांचे पथकाने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरुन दिनांक 27/09/2019 रोजी खबर मिळाली की, ग्राम सवणा येथुन चिखली कडे एक MH-31 CR-7310 पांढ-या रंगाची कारमध्ये काही इसम कसव ची तस्करी करुन येणार आहे. अशा माहीती वरुन ग्राम वळती शिवार ता. चिखली येथे नाकाबंदी केली असता एक पांढ-या रंगाची कार क्र MH-31 CR-7310 ही आल्याने तिस थांबवून त्यामध्ये चार इसम नामे 1) हकीम शहा बाबाशहा वय 40 रा कोंथळी 2) विजय उर्फ बाळु तुकाराम गायकवाड वय 37 रा कोथळी हमु सुदंरखेड बुलडाणा 3) शेख सत्तार उर्फ मुन्ना शेख जब्बार वय 45 रा किन्होळा 4) शेख साबीर शेख सत्तार वय 21 रा माळीपुरा चिखली असे मिळुन आले पंचासमक्ष त्यांचे गाडीची झडती घेतली असता त्यामध्ये एक दुर्मिळ जातीचे कासव त्याची लांबी 24 सेमी हे मिळुन आल्याने त्यांना विचारपुस केली असता हे कासव दुर्मिळ जातीचे कासव जंगलातुन तस्करी करुन पकडुन आणले असुन त्याची चांगल्या भावात विक्री करण्याकरीता घेवुन जात आहे. वरुन वनविभाग अधिकारी श्री. टेकाळे यांना माहिति देवुन त्यांनी संदिप परीहार वनपाल घाटबोरी आणी विलास मेरत वनरक्षक बुलडाणा यांना पाठवुन त्यांचे कडुन खात्री केली असता त्यांनी सांगीतले की हे दुर्मिळ जातीचे कासव आहे वरुन 1) दुर्मिळ जातीचे कासव किंमती 45,000/- 2) एक स्विप्ट डिझायर कार क्र MH 31 CR 7310 किंमती 4,00,000/- 3) चार मोबाईल किंमती 19,000/- एकून किंमती 4,64,000/- रुपायाचा माल मिळुन आल्याने जप्त करुन ताब्यात घेतला त्यांचेवर पोलीस स्टेशन चिखली येथे कायदेशीर कार्यवाही करुन कासव हा सुखरुप वनविभाग यांचे ताब्यात देण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक

स्थानिक गुन्हे शाखा बुलडााणा

